1 २ 5193121

ग्रामपंचायत कार्यालयीन कामी केलेल्या गैरवर्तना बाबत शिक्षा अंतिम करणे बाबत. (श्री.राजेंद्र किसन वर्पे ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत समशेरपुर/देवठाण ता.अकोले )

जिल्हा परिषद अहिल्यानगर
आदेश ग्रामपंचायत विभाग /ग्रांप-३ / क्र.-११९२३३३
दिनांक २९ / ०८ /२०२५

संदर्भ :- १. या कार्यालयाकडील दोषारोपपत्र / ज्ञापन क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/६८७ दिनांक- ०५/०९/२०२२

२. या कार्यालयाकडील आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/३१२/२०२३ दिनांक- २०/०४/२०२३ (चौकशी अधिकारी नियुक्ती)

३. सहा.आयुक्त (चौकशी), नाशिक यांचेकडील चौकशी अहवाल क्र. विशा.४/खाचौ /सी.आर.८९/२०२३, दिनांक- २१/०३/२०२४ प्राप्त दिनांक २०/०५/२०२४

४. विभागीय चौकशी नियम पुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ मधील प्रकरण सात मधील परिशिष्ठ ७.१

५. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४

६. या कार्यालयाकडील अंतिम कारणे दाखवा नोटीस क्र.ग्रांप ३/५३०१४५ दि.१३/०५/२०२४

७. श्री.राजेंद्र किसन वर्पे यांचा खुलासा दिनांक ०७/१०/२०२४ व दिनांक २८/१०/२०२४

ज्या अर्थी संदर्भ क्र.१ अन्वये श्री.राजेंद्र किसन वर्पे तत्कालीन ग्रामविकास अधिकारी समशेरपुर/देवठाण ता.अकोले यांनी कार्यालयीन कामी गैरवर्तन व गैरव्यवहार केल्याने त्यांचे गैरवर्तना बाबत दोषारोपपत्र बजावणेत आले होते. संदर्भ क्र.०२ नुसार श्री.वर्पे ग्रामविकास अधिकारी यांचे गैरवर्तनाची विभागीय चौकशी सुरु करणे कामी चौकशी अधिकारी यांची नेमणुक करणेत आली होती. संदर्भ क्र. ३ नुसार सहाय्यक चौकशी अधिकारी नाशिक विभाग नाशिक यांनी चौकशी पुर्ण करुन चौकशी अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. श्री.राजेंद्र किसन वर्पे यांचे वर एकूण ०७ दोषारोप ठेवण्यात आलेले आहेत. व सर्व ०७ पैकी ०७ दोषारोप चौकशी अहवालामध्ये सिध्द झालेले आहेत.

श्री.वर्पे यांनी ग्रामपंचायत कार्यालयीन कामी सचोटीने न वागून व कर्तव्यपरायण न राहून महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक)नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केलेला आहे. सबब त्यांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ ( ७ ) नुसार, सेवेतुन बडतर्फ करणे ही शिक्षा का करणेत येऊ नये? या बाबतची अंतिम कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे.

संदर्भ क्रमांक ०७ अन्वये श्री.राजेंद्र किसन वर्पे ग्रामविकास अधिकारी समशेरपुर/देवठाण ता.अकोले यांनी शिक्षा अंतिम करणेच्या नोटीसचा दोषारोपा बाबतचा खुलासा सादर केलेला असुन त्या मध्ये त्यांचे बचावाचे म्हणणे सादर केलेले आहे.श्री. राजेंद्र किसन वर्पे यांच्या प्राप्त खुलाश्याचे अवलोकन केले असता व श्री.वर्पे यांच्या विभागीय चौकशीमध्ये सिध्द झालेले आरोप विचारात घेता खालील बाबी निदर्शनास येत आहे.

प्रशासकीय अनियमितता.

| अ.नं | प्रशासकीय अनियमितता बाब | ग्रामपंचायत |
|---|---|---|
| १ | ग्रामनिधी सन २०२०-२०२१ मध्ये करावयाचा १० टक्के व १५ टक्के खर्च त्यांच्या कालावधीत शुन्य केलेला आहे. | समशेरपुर |
| २ | ग्रामपंचायत अभिलेखे १ ते ३३ नोंदवहया अदयावत न ठेवणे. | समशेरपुर |
| ३ | ग्रामपंचायत समशेरपुर येथिल सांस्कृतिक भवन भाग -१ चे बांधकाम करतांना खर्च करण्यापूर्वी धावते देयक न घेता खरेदी करणे , बांधकामासंदर्भात शासकीय भरणा न करणे.सरपंचाच्या नावे रु. ९३४२४८/- रुपयांचा धनादेश काढण्यासंदर्भात ग्रामपंचायत समशेरपुर यांनी केलेल्या ठरावामध्ये असा धनादेश काढता येत नसल्याबाबत मत श्री. वर्पे यांनी नोंदविले मात्र ठराव पंचायत समितीकडे सात दिवसांच्या आत सादर करणे आवश्यक असतांना तो ठराव सादर केलेला नाही. | समशेरपुर |
| ४ | विभागीय चौकशी मधील मुददा क्रमांक ०७ आरोप सिध्द झालेला आहे.- समशेरपुर ता. अकोले येथे रु. ८.५० लक्ष अंदाजपत्रकीय रकमेच्या पेसा १५ वा वित्त आयोगातुन कामाच्या निविदेमध्ये कायदेशीर बाबींची पूर्तता असलेल्या निविदा रद्द करणे. | समशेरपुर |
| ५ | कोरम अपूर्ण असतांना ही मासिक सभा घेऊन कलम ३६ चे उल्लंघन करणे. | समशेरपुर |

आर्थिक अनियमितता /संशयीत अपहार रक्कम

| अ.नं. | बाब | सन | रक्कम | ग्रामपंचायत |
|---|---|---|---|---|
| १ | दरपत्रकाशिवाय खर्च-ग्रामनिधी | २०१९-२०२० | ३२०६०५ | समशेरपुर |
| २ | कोटेशन शिवाय खर्च | २०१९-२०२० | १५४७७९ | समशेरपुर |
| ३ | दरपत्राकाशिवाय खर्च पाणी पुरवठा निधी | २०२०-२०२१ | १०६७६१ | समशेरपुर |
| ४ | नियमबाहय खर्च | २०१९-२०२० | ७००० | समशेरपुर |
| ५ | नियमबाहय खर्च-१४ वा वित्त आयोग विकास कामे नाहीत. | २०१९-२०२० | ५०२६२३९ | समशेरपुर |
| ६ | नियमबाहय खर्च-पाणी पुरवठा निधी | २०२०-२०२१ | २७००० | समशेरपुर |

- आर्थिक अनियमितता/ संशयीत अपहार

| अ.नं | बाब | सन | रक्कम रुपये | ग्रामपंचायत |
|---|---|---|---|---|
| १ | दरपत्राका शिवाय खर्च - | २०१९-२०२० | ६०३४६५ | देवठाण |
| २ | दरपत्राका शिवाय खर्च- ग्रामनिधी / पाणीपुरवठा निधी चा | २०१९-२०२० | ३२५८६७ | देवठाण |
| ३ | १४ वा वित्त आयोग | २०१७-२०१८ | ८२१५२६ | देवठाण |
| ४ | दरपत्राका शिवाय खर्च- पाणीपुरवठा | २०१९-२०२० | ६३६३८ | देवठाण |
| ५ | दरपत्रकाशिवाय खरेदी | २०१९-२०२० | २६०५४ | देवठाण |

विभागीय चौकशीतील कायमस्वरुपी अपहार

| अ.नं | बाब | ग्रामपंचायत | रक्कम रुपये | |
|---|---|---|---|---|
| १ | प्रमाणका शिवाय खर्च करणे | समशे पुर | ४४७८०/- | कायमस्वरुपी अपहार |
| २ | प्रमाणका शिवाय खर्च करणे | देवठाण | १६०१७५९/- | कायमस्वरुपी अपहार |

विभागीय चौकशी आरोपांव्यतीरीक्त लेखा परीक्षण अहवाल पुढील प्रमाणे आहे.

सहायक संचालक स्थानिक निधी लेखापरिक्षा अ.नगर यांचे कडील ग्रामपंचायत देवठाण येथील दिनांक ०७/०८/२०२४ खास प्रतिवृत्त अवलोकनार्थ सादर केले आहे. श्री.वर्पे हे दिनांक १९-१०-२०२१ ते ३१-०३-२०२१ या कालावधीत कार्यरत होते त्यांचे कालावधीतील आर्थिक गैरव्यवहार अपहारखालील प्रमाणे झाल्याचे निदर्शनास येत आहे.

१ } कायमस्वरुपी अपहार-४३०१५५/- २ } ११४०९६८९/-एकुण अपहार ११८३९८४४/- मात्र दर्शविला आहे.
कायमस्वरुपी अपहार दिनांक २०/०५/२०१९ रक्कम रुपये ३५५००/- दिनांक ०९/१०/२०२० रक्कम रुपये एकूण रक्कम रुपये ३५७४७/- मात्र पैकी संबधीताकडून ५० टक्के वसुलपात्र रक्कम १७८७३/-

संशयीत अपहार - १ } विकास कामे - सन २०१९-२०२० जगताप वस्ती बोअरवेल रक्कम १०१५६९/-
२ } उप प्रमाणाशिवाय खर्च सन २०२०-२०२१ मधील

क्र.१. दिनांक ०६-०५-२०२० रुपये ३५०००/-क्र.२.दिनांक १६-०५-२०२० रुपये ३५०००/-क्र.३दिनांक १६-०५-२०२० रुपये २८०००/- क्र.४दिनांक ०८-०६-२०२० रुपये ५७५०५ क्र.५ दिनांक ०९-०७-२०२० रुपये ३५०००/- क्र.६ दिनांक ०९-०७-२०२० रुपये ३५०००/- क्र.७ दिनांक ०९-०७-२०२० रुपये २४५००/- क्र.८ दिनांक १९-०८-२०२० रुपये ६५५३४/- एकूण रक्कम रुपये ३१५५३९/-

३ } ग्रामनिधी खात्यातील विकास कामे लेख उपलब्ध करुन न देणे रुपये -५४०५९४/-

४ } प्रमाणे व उप प्रमाणाशिवाय खर्च सन २०१९-२०२०

क्र.१. दिनांक १४-०५-१०१९ रुपये ७५३१० /-क्र.२.दिनांक २०-०७-२०१९ रुपये १२६०० /-क्र.३ दिनांक २०-०७-२०१९ रुपये २०००० /- क्र.४ दिनांक २५-०७-२०१९ रुपये ५००० /- क्र.५ दिनाक ३०-०७-२०१९ रुपये ४१५००/- क्र.६ दिनांक ३०-०७-२०१९ रुपये १५०००/- क्र.७ दिनांक ३१-०८-२०१९ रुपये १५९००/- क्र.८ दिनांक ०९-०३-२०२० रुपये ३३८७८/- क्र.९ दिनांक ०९-०३-२०२० रुपये ४०१५०/- क्र.१० दिनांक ०९-०३-२०२० रुपये १४०००/- एकूण रक्कम रुपये २७३३३८/-

१४ वा वित्त आयोग -प्रमाणकाशिवाय खर्च सन २०२०-२०२१

क्र.१. दिनांक २०-०९-२०२० रुपये ३१००० /-क्र.२.दिनांक २३-०८-२०१९ रुपये २००० /- एकूण रक्कम रुपये ५१०००/-

१४ वा वित्त आयोग - पुरवठा दाराऐवजी इतरांचे नावावर रक्कम प्रदान करणे सन २०१९-२०२०

क्र.१. दिनांक १४-०५-१०१९ रुपये १६९९२ /-क्र.२.दिनांक १४-०५-२०१९ रुपये ७५३१०/-क्र.३ दिनांक २०-०५-२०१९ रुपये ३१००० /- क्र.४ दिनांक २५-०५-२०१९ रुपये ६५६१९ /- क्र.५ दिनाक ०१-०७-२०१९ रुपये ४५०००/- क्र.६ दिनांक ०१-०७-२०१९ रुपये ३००००/- क्र.७ दिनांक १५-०७-२०१९ रुपये ४९०००/- क्र.८ दिनांक २५-०७-२०१९रुपये १२५००/- क्र.९ दिनांक ३०-०७-२०१९ रुपये ४१५००/- क्र.१० दिनांक २३-०८-२०१९ रुपये ४७०००/- क्र.११ दिनांक ३१-०८-२०१९ रुपये १५९००/- क्र.१२ दिनांक३१-०८-२०१९ रुपये १९५००/- क्र.१३ दिनांक११-०८-२०२० रुपये १२०००/-/- एकूण रक्कम रुपये ६१४२५०/-

एकुण संशयीत अपहार एकूण रक्कम रुपये -१८९६२९०/- पैकी संबधीताकडुन ५० टक्के वसुलपात्र रक्कम ९४८१४५/-दिसून येते.

अपहारीत रकमेचा गोषवारा

| अ.नं | अपहार | एकूण अपहारीत रक्कम (सरपंच /ग्रामसेवक संयुक्त जबाबदारी) | ५० टक्के ग्रांप सचिव वसुल पात्र रक्कम |
|---|---|---|---|
| १ | कायमस्वरुपी अपहार | ३५७४७/- | १७८७३/- |
| २ | संशयीत अपहार | १८९६२९०/- | ९४८१४५/- |

श्री.वर्पे यांनी सादर केलेल्या खुलश्या सोबत त्यांनी कोणतेही समर्थनीय बचावात्मक म्हणणे अथवा पुरावे सादर केलेले नाहीत.त्यामुळे श्री.वर्पे यांनी या कार्यालयाच्या अंतिम कारणे दाखवा नोटीसीनुसार सादर केलेला खुलासा प्रशासकीय दृष्टया समर्थनीय नसल्याने सदर खुलासा अमान्य करण्यात येत आहे.

सबब श्री.वर्पे यांच्या विभागीय चौकशी संदर्भात प्राप्त चौकशी अहवालानूसार श्री.वर्पे यांनी ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत समशेरपूर /देवठाण ता.अकोले येथे कार्यरत असताना प्रामुख्याने वरील प्रकारची प्रशासकीय अनियमितता, आर्थिक अनियमितता/संशयीत अपहार व कायमस्वरुपी अपहार केल्याचे निदर्शनास आले आहे.

या व्यतीरिक्त अन्य अनियमितता विभागीय चौकशी अहवालानुसार राहतील.श्री.वर्पे यांनी वरिल प्रमाणे केलेल्या अनियमिततेनुसार त्यांचेवर कायमस्वरुपी अपहारीत रकमेची निश्चिती करणे व सदर रकमेची वसुली करणे गटविकास अधिकारी अकोले यांना बंधनकारक राहिल.

सबब श्री.वर्पे यांच्या विभागीय चौकशी अहवालामध्ये सिध्द झालेल्या आरोपामधील गैरवर्तना बाबत मी (शिस्त) विषयक प्राधिकरण जिल्हा परिषद अहिल्यानगर तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर मला प्रदान अधिकारान्वये श्री.राजेंद्र किसन वर्पे ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत समशेरपुर/देवठाण ता.अकोले यांनी प्रकरणी केलेल्या गैरवर्तना बाबत महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ ( ७ ) नुसार या आदेशान्वये त्यांना जिल्हा परिषद सेवेतून बडतर्फ करणेची शिक्षा अंतिम करीत आहे.सदरच्या आदेशाची नोंद संबधीताचे सेवा पुस्तकात घेण्यात येऊन पुढील कार्यवाही संबधीत कार्यालय यांनी करावी.

जिल्हा परिषद www.nagarzp .gov.in संकेतस्थळ
संकेतांक क्रमांक -२०२५०४ २९०६००५२

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 29-04-2025 15:14:02
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति :-

श्री.राजेंद्र किसन वर्पे ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत ता.अकोले

प्रत-माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव रवाना

२/-गट विकासअधिकारी पंचायत समिती अकोले

२/-सदरचा शिक्षेचा आदेश श्री.राजेंद्र किसन वर्पे ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत ता.अकोले ग्राविअ यांना बजावून बजावले बाबतची तारखेसह स्वाक्षरीची दुय्यम प्रत या कार्यालयास तात्काळ सादर करावी तसेच आदेशात नमुद केल्या प्रमाणे श्री.वर्पे यांच्यावर अपहारित रकमेची निश्चिती करणे व सदर रकमेची वसुली करणे या बाबतची कार्यवाही पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी.